संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# नव्या सरकारला लाचखोरांची सलामी

एकीकडे महाराष्ट्रामध्ये नवे सरकार अस्तित्वात येत असताना त्याच काळामध्ये महाराष्ट्रातल्या भ्रष्टाचाराच्या सुरस कहाण्या प्रसिध्द होत होत्या. राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गेल्या वर्षभरात राज्यामध्ये तब्बल एक हजार पाच सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना रंगेहाथ पकडले. यातला धक्कादायक भाग असा की गेल्या वर्षीपेक्षा पैसे खाणाऱ्यांच्या प्रमाणात चौपट वाढ झाल्याचे आढळून आले. यामध्ये राज्याचे महसूल खाते पहिल्या क्रमांकावर होते. दुसऱ्या क्रमांकावर पोलीस खाते होते. तिसऱ्या क्रमांकावर मुंबई महापालिकेने नंबर लावला आणि अतिशय खेदजनक भाग असा की राज्याचे शिक्षण खातेसुध्दा याच लाचखोरीमध्ये आघाडीवर राहिल्याचे पहायला मिळाले. सत्तेवर येणारे सरकार एकीकडे स्वच्छ कारभाराची ग्वाही देत होते. तर मावळत्या सरकारमधल्या तीन मंत्र्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्याची परवानगी सरकारच्या लाचलुचपत विभागाने मागितली होती. याशिवाय याच काळात काळ्या पैशाबाबत देशभर चर्चा सुरू झाली आणि यात अडकलेल्यांची नावे जाहीर करावी म्हणून न्यायालयाने केंद्र सरकारला फटकारण्याची घटना घडली. ज्याच्याकडे काळा पैसा आहे आणि ज्यांनी परदेशी बँकांमध्ये दडवला आहे त्यांनी तो बाहेर काढून घेण्याची धडपड सुरू केली आहे. आणि म्हणूनच गेल्या दहा महिन्यांत भारतामध्ये न भूतो न भविष्यती अशी सोन्याची आयात झाली. शिवाय मुंबईच्या विमानतळावर याचकाळात तब्बल एक हजार कोटींचे चोरटे सोने पोलिसांच्या हाती लागले. एकट्या मुंबई महापालिकेतल्या चार अभियंत्यांना पंधरा लाखांची लाच घेताना याचकाळामध्ये पकडले गेले. यावरून नवे सरकार येण्याची वेळ आणि त्या काळात घडलेल्या भष्टाचाराच्या घटना या दोन्ही गोष्टींकडे दुर्लक्ष करता येत नाही. कारण हे नवे सरकार येण्यासाठी या राजकीय पक्षांनी निवडणुकीमध्ये राज्यातला भ्रष्टाचार संपवण्याची ग्वाही दिली होती. प्रामुख्याने सरकारी पातळीवर किती प्रचंड प्रमाणात हा भ्रष्टाचार वाढलेला आहे हे या घटनांवरून सिध्द होते. निवडणूक वर्षामध्ये अचानकपणे पैसे खाणाऱ्यांचे प्रमाण वाढावे, नुसतेच वाढलेले नाही तर त्यात चौपटीने वाढ झाली. ही गोष्ट अतिशय गंभीर ठरते, म्हणजेच नव्या सरकारला नुसत्या घोषणा करून चालणार नाही तर त्याची सुरुवात सरकारी पातळीवरच्या लाचखोरीच्या निर्मूलनाने करावी लागेल.

### लाचखोरीत चौपट वाढ

सामान्य माणसाने लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मतदान करताना भ्रष्टाचाराविरुध्द आपले मत नोंदविले होते. येणारे सरकार महागाई आणि भ्रष्टाचार याविरुध्द ठोस पावले उचलेल अशी त्याची अपेक्षा होती. परंतु केंद्रात मोदी सरकार येऊन झालेले पाच महिने आणि त्याचवेळी महाराष्ट्रात वाढलेल्या घटना सामान्य माणसाचा अपेक्षाभंग करणाऱ्या ठरतात. नरेंद्र मोदी हे भ्रष्टाचाराविरुध्द जोरादार मोहीम उघडतील असे लोकांना वाटत होते. ते जर त्यांनी दाखवून दिले असते तर कदाचित भ्रष्टाचार करणाऱ्यांवर दबाब निर्माण झाला असता. आज महाराष्ट्रासारख्या स्वत:ला प्रगतीशिल म्हणवणाऱ्या राज्यात केवळ १० महिन्यांत एक हजार पाच सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी भ्रष्टाचाराच्या आरोपावरून पकडले जातात. यावरून बिहार, उत्तरप्रदेश किंवा देशाच्या अन्य राज्यांमध्ये सरकारी पातळीवर पैसे खाण्याचे प्रमाण किती प्रचंड असेल हे सहज लक्षात येते. महाराष्ट्रात नवे सरकार स्थापन होत असताना भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यांनी आपली सलामीच नव्या मुख्यमंत्र्यांना दिली आहे. त्या वेळेला सरकारच्या महसूल खात्यातले २७० कर्मचारी, पोलीस विभागातले २८६ कर्मचारी, शिक्षण खात्याने ४९ कर्मचारी आणि महापालिकेतले ४८ कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक जाळ्यात अडकतात. यावरून भ्रष्टाचार करण्याचे जाळे किती भक्कम आहे हे सिध्द होते. यातला गंभीर भाग असा की गेल्या वर्षी महसूल खात्यातले १४८, पोलीस विभागातले १५५, शिक्षण खात्यातले १४ तर महापालिकेतले ३७ कर्मचारी रंगे हात पकडले गेले होते. यावर्षी ही संख्या चौपटीने वाढली याचा अर्थ भ्रष्टाचार कमी होण्याऐवजी तो चौपट वेगाने वाढला आहे हे सिध्द होते. सरकार कोणाचेही येवो लाचखोरावर त्यांचा कोणताही परिणाम होत नाही. असेच या आकडेवारीवरून म्हणावे लागेल.गेल्या दहा महिन्यांमध्ये सापडलेले हे हजारावरील लाचखोर हा सगळ्या भ्रष्टाचाराने माखलेल्या व्यवस्थेतला एक भाग ठरतो.यापेक्षा कितीतरी पटीने सगळ्याच सरकारी खात्यांमध्ये लाचखोरी माजलेली आहे.त्यातले अनेकजण तर इतके सराईत आहेत, की ते कधीही आणि कोणाच्याही हाती लागत नाहीत.आतापर्यंत थेट मंत्र्यांनाही या लाचखोरीमध्ये वाटा दिला जात होता.त्यातून एकमेकांना सांभाळून घेण्याची वृत्ती वाढत गेली आणि भ्रष्टाचाराचे हे लोण अगदी खालच्या थरापर्यंत झिरपत गेले.

### नव्या सरकारपुढे आव्हान

महाराष्ट्रातल्या भ्रष्टाचाराने तर गेल्या १५ वर्षांमध्ये सगळेच विक्रम मोडले. त्याचे धडधडीत उदाहरण म्हणजे जलसिंचन खात्यामध्ये ७० हजार कोटींचा घोटाळा झाल्याचे उघडकीस आले. दिल्लीतल्या महाराष्ट्र सदनाचे बांधकाम करताना प्रचंड गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले. आदर्श इमारत घोटाळा तर देशभर गाजला. यात अडकलेल्या तीन मंत्र्यांविरुध्द खटले दाखल करण्याची मागणी सरकारच्या लाचलुचपत विभागाला करावी लागली. मुंबईसारख्या आर्थिक राजधानीत महापालिकेचे इमारत बांधकाम खाते भ्रष्टाचाराचे आगार ठरले. याठिकाणी नव्या इमारतीच्या बांधकामाला परवानगी देण्याकरीता एका चौरस फुटामागे १२०० रुपये लाच मागण्याचा प्रकार उघड पणे चालू राहतो. यावरून महापालिका काय किंवा मंत्रालय काय या सगळ्याच ठिकाणी लाचखोरांचा हैदोस सुरू असल्याचे दिसून येते. आता नव्याने स्थापन होणाऱ्या सरकारपुढे याच लाचखोरांचे मोठे आव्हान आहे. त्याच्याशी सामना करायचा की मागच्या सरकारप्रमाणे हातमिळवणी करून लाचखोरांना आणि स्वत: लाही अभय द्यायचे, हे नव्या सरकारला ठरवावे लागणार आहे. नवे सरकार स्थापन होण्याच्या दोन दिवस आधीच राज्याच्या लाचलुचपत विभागाने ही आकडेवारी जाहीर केली. त्यातली वाढलेली संख्या म्हणजेच नव्या सरकारला लाचखोरांनी दिलेली सलामीच ठरते.

आपल्या देशातल्या राजकारण्यांना सरकारी पैशावर मजा मारण्याची घाणेरडी सवय लागली आहे. मग तो साधा ग्रामपंयतीचा सरपंच असो, ग्रामसेवक असो किंवा नगरसेवकापासून आमदार खासदार मंत्र्यापर्यंत सर्वांना सरकारी तिजोरीतून जेवढे काही ओरबडता येईल तेवढे ओरबडण्यामध्ये फार धन्यता वाटते. याचे अगदी ताजे आणि तितकेच विचार करण्यासारखे उदाहरण म्हणजे नव्या मंत्र्याचे होणारे सार्वजनिक स्वरुपाचे शपथविधी. मग नरेंद्र मोदींचा राष्ट्रपतीभवनाच्या प्रांगणात झालेला शपथविधी असेल किंवा हरयाणाच्या मुख्यमंत्र्यांच्या पंचकुल स्टेडियममध्ये झालेला अथवा महाराष्ट्रात मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमधला जंगी शपथविधी सोहळा असेल. यासाठी सरकारी तिजोरीवर भार टाकण्याची प्रवृत्ती एकूण राजकीय उधळेपणाने समर्थन करणारी ठरते. राजा हा जनतेच्या पैशाचा आणि विकासाचा विश्वस्त म्हणजेच ट्रस्टी असतो. त्याच्याकडून सामान्य जनतेला दिलासा हवा असतो. करातील पैशाचा काटेकोर वापर करणे अपेक्षित असते. एकेक पैशाचा हिशोब ठेवून आवश्यक त्याठिकाणी पैसा खर्च करण्याची प्रवृत्ती हीच प्रशासन कुशलता दाखविणारी ठरते. आपण निवडणुकीत विजयी किंवा प्रचंड मताधिक्क्याने विजयी झालो, त्याचा उत्सव सरकारी खर्चातून करण्याचा हा प्रकार राजकीय सवंगपणा आणि सामाजिक वौगुण्याचे प्रदर्शन करतो. असा जाहीर शपथविधी सोहळा आयोजित करण्याचा उद्देश तरी काय तर आपापल्या मतदारसंघातल्या कार्यकर्त्याला पक्षीय विजयाचा अधिकृत आनंद  लुटता यावा, शपथविधी हा केवळ एक सरकारी उपचार न ठरता तो सर्वसामान्य जनतेचा सोहळा ठरावा. त्यात सामान्य माणसाला सहभागी होता यावे, या सोहळ्याला असलेले सरकारी कवच गळून पडावे थोडक्यात काय तर तो केवळ राज्यपाल, राष्ट्रपती आणि मंत्र्यापुरता समारंभ न ठरता सामान्य माणसाचा सोहळा व्हावा, असा युक्तिवाद या राजकीय पक्षांकडून केला जातो. आपल्या या आनंदात जनतेला सहभागी करून घेण्याच्या त्यांच्या या भावनेचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. ही सामान्य जनतेविषयी उदारता तर हल्लीच्या राजकारणात शोधूनही सापडत नाही. म्हणूनच तसे पाहिले तर अशा अनेक गोष्टी आहेत, की ज्यामध्ये शासनाचे असे अनेक निर्णय असतात की जनतेपासून गोपनीय ठेवले जातात. सामान्य जनतेला अंधारात ठेवून अनेक निर्णय राजकर्ते आणि नोकरशाही परस्पर घेत असतात. तेव्हा सामान्य जनतेच्या नावावर तिकीट फाडण्याचे कारण नाही. हा सरळसरळ पक्षीय प्रसिध्दीचा राजकीय स्टंट असतो. अगदी आम आदमी पार्टीनेसुध्दा दिल्लीच्या रामलीला मैदानावर शपथविधीचा धिंगाणा घालून लाखो रुपयांचा चुराडा केला होता. याशिवाय यानिमित्ताने वाहतुकीची होणारी कोंडी व्हीआयपी लोकांमुळे सामान्यांचे होणारे हाल या गोष्टी होतात. त्याचा त्रास लोकांना सहन करावा लागतो.

शपथविधीचा जंगी सोहळा करायला आमची किंवा सामान्य जनतेची कोणतीही हरकत नाही. त्यांनी आपल्या निर्णयाचा मंत्रीपदी विराजमान होणारा आनंद अगदी सुखाने अनुभवावा. परंतु त्याचा भुर्दंड सरकारी तिजोरीवर पडता कामा नये. आतापर्यंत परंपरेप्रमाणे साधारणपणे सगळे शपथविधि राजभवन किंवा राष्ट्रपतीभवनात होत होते. त्याठिकाणी जागा मर्यादित असल्याने जनतेला किंवा त्या त्या पक्षाच्या सगळ्याच कार्यकर्त्यांना सामावून घेत नाही. परंतु त्यामुळे फार मोठा फरक पडतो असे समजण्याचे कारण नाही. आज महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी वानखेडे स्टेडियमवर झाला. त्यासाठी या स्टेडियमचे पाच पंचवीस लाखाचे भाडे, शिवाय तिथे उभारली जाणारा भव्य शामियाने त्यावर होणारा दहा बारा लाखांचा खर्च याबरोबर सार्वजनिकरित्या कार्यक्रम होत असल्याने जादा पोलीस फौजफाटा लावण्याची गरज, त्यासाठी होणारा अतिरिक्त खर्च या सगळ्याची बेरीज केली तर तो शपथविधी कोटी दीड कोटीच्या सहजपणे चुराडा करणारा ठरतो. हा सगळा खर्च सरकारी तिजोरीतून करण्याचा आग्रह कशासाठी. जो राजकीय पक्ष सत्तेवर येणार असतो त्याने या खर्चातला काही भाग सहन केला पाहिजे किंवा शपथविधी झाल्यावर त्या त्या पक्षाने तो समारंभ किंवा जंगी सोहळा साजरा करावा. सरकारी पैशावर या प्रकारची उधळपट्टी कर्जबाजारी महाराष्ट्राला कितपत परवडणारी आहे याचा भाजपासारख्या पक्षाने निश्चित विचार केला पाहिजे.

एकतर शपथविधी या कार्यक्रमाचे एक घटनात्मक भव्य आहे, त्याचे प्रशासनिक गंभीरसुध्दा आहे तो काही इव्हेंट किंवा एन्टरटेनमेंट कार्यक्रम होऊ शकत.